# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

बैठक क्र. 63

# बैठक इतिवृत्त

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६३ दिनांक ११.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० ते ०१.३० या वेळेत Online व Offline पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस Online व Offline पद्धतीने उपस्थित सदस्यांची नावे खालीलप्रमाणे.

१. प्रा. संजिवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **अध्यक्ष**
२. डॉ. भरतभाई जोशी, कुलगुरु, युनिव्हर्सिटी ऑफ गुजराथ विद्यापीठ, गुजरात, सदस्य
३. डॉ. चंद्रकांत बाविस्कर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, सदस्य
४. डॉ. निशा वळवी, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, **सदस्य**
५. डॉ. चेतना सोनकांबळे, श्री.शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, **सदस्य**
६. डॉ. चेतना कामळस्कर, प्राध्यापक, विज्ञान विद्याशाखा, **सदस्य**
७. डॉ. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक, विद्यार्थ्यी सेवा विभाग, **सदस्य**
८. डॉ. लतिका गायकवाड, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा, **सदस्य**
९. डॉ. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थ्यी सेवा विभाग, **सदस्य**
१०. प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **सदस्य सचिव**
११. डॉ. दयाराम पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **सदस्य**
१२. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **सदस्य**
१३. डॉ. साधना लामतुरे, शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, **निमंत्रित सदस्य**
१४. श्री. ज्ञानेश्वर जाधव, शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, **निमंत्रित सदस्य**
१५. श्री. शिवानंद कहाळेकर, शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, **निमंत्रित सदस्य**
१६. डॉ. राजकुमार ननवरे, शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **निमंत्रित सदस्य**
१७. श्रीम. स्नेहल मांजरेकर शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **निमंत्रित सदस्य**

**काही कारणास्तव खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.**

१. प्रा. संजय चाकणे, तुलाराम महाविद्यालय, पुणे, **सदस्य**
२. डॉ. अमृत भारवाड, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद गुजरात, सदस्य

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

सदरच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आलेले विषय व सर्वानुमते त्यावर झालेले निर्णय पुढीलप्रमाणे

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 63. | उपस्थित सदस्यांचे स्वागत |
| 63.01 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 01**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६२ च्या इतिवृत्त मान्यता.<br>**निर्णय:** ६२च्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्ताचे वाचन करून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. (सहपत्र १) |
| 63.02 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 02**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६२ च्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे.<br>**निर्णय:** ६२ च्या परिषदेच्या कार्यवाही अहवालाची माहिती अध्यक्ष यांनी करून दिली. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. (सहपत्र २) |
| 63.03 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 03**<br>**विषय : एम.ए. शिक्षणशास्त्र संशोधन कृती मूल्यमापन योजना मान्यता**<br>**टिपणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे NEP2020 नुसार M 83 नुसार एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम राबविण्यात येत आहे. त्यात सत्र - 3 मध्ये 4 श्रेयांक आणि सत्र - 4 मध्ये 6 श्रेयांकांचे संशोधन कार्य आहे. त्यातील कृतीस दिनांक. २७/०५/२०२४ रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. 60 मधील विषय क्र. 60.5 नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचे गुणदान पुढील प्रमाणे आहे. |

- **सत्र - 3 घटक गुणदान**

| अ.क्र. | कृती | अंतर्गत परीक्षक | बहिस्थ परीक्षक |
|---|---|---|---|
| १) | संशोधन आराखडा | १० | १० |
| २) | शोधगंगावरील दोन संशोधन अहवालांचा सारांश | १० | १० |
| ३) | महिनानिहाय संशोधन कृती तक्ता | १० | १० |
| ४) | संशोधन कार्य मौखिक परीक्षा | २० | २० |
| | **एकूण गुण** | **५०** | **५०** |

- **सत्र - 4 घटक गुणदान**

| अ.क्र. | कृती | अंतर्गत परीक्षक | बहिस्थ परीक्षक |
|---|---|---|---|
| १) | संशोधन समस्येला अनुसरून संशोधन पद्धतीनुसार संशोधन कृती मूल्यमापन | १५ | १५ |
| २) | शोधगंगावरील पाच संशोधन अहवालांच्या सारांशाचा संबंधित संशोधन आढाव्यात समावेश | १० | १० |
| ३) | शोधनिबंध विकसन (५ संबंधित लेखाचा अभ्यास व समावेश) | १५ | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | संशोधन अहवाल लेखन व सादरीकरण | २० | २० |
| ५) | संशोधन कार्य मौखिक परीक्षा | १५ | १५ |
| | एकूण गुण | ७५ | ७५ |

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

संशोधन कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी विद्यापीठामार्फत सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत आहे.

१) अंतर्गत परीक्षक हे विद्यार्थांचे संशोधन मार्गदर्शकअसतील.

२) एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमांच्या इतर अभ्यासकेंद्रावरील संशोधन मार्गदर्शक बहिस्थ परीक्षक म्हणून कार्य करतील.

३) बहिस्थ परीक्षकांची Directory तयार करण्यात येईल. या Directory मधून विद्यार्थांचे संशोधन कार्य याद्दच्छिक पद्धतीने मूल्यमापनासाठी बहिस्थ परीक्षकांकडे ऑनलाइन पद्धतीने जातील.

४) अंतर्गत आणि बहिस्थ परीक्षक मूल्यमापन केल्यानंतर लगेचच गुण व सूचनाअसल्यास त्या देण्यात येतील.

५) विद्यार्थ्याला सत्र 3 मध्ये देण्यात आलेले बहिस्थ परीक्षक व सत्र 4 चेही बहिस्थ परीक्षक म्हणून कार्य करतील. अभ्यासकेंद्रांमार्फत सत्र 3 व सत्र 4 मौखिक परीक्षा ऑनलाईन पद्धतीने झूमद्वारे घेण्यात येईल. त्याचे व्हिडीओ रेकोर्डिंग करणे अभ्यासकेंद्रांना बंधनकारक असेल.

६) काही अपरीहार्य कारणास्तव बहिस्थ परीक्षकांनी वेळेत कार्य पूर्ण न केल्यास शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे दुसरे बहिस्थ परीक्षक देण्यात येतील.

**निर्णय :**

NEP2020 नुसार M 83 नुसार एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमातील संशोधन कार्याचे मूल्यमापनाबाबत वरील १ ते ६ नियमांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

63.04 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 04**

**विषय : सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठीच्या पदवीधर वेतनश्रेणीच्या अतिरिक्त गुणांबाबत.**

**टिप्पणी :** बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार इयत्ता ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास शिक्षणाचा हक्क देण्यासाठी प्राथमिक शाळांमधील २५% शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी देण्यात आली व त्यांच्या पदवीधर वेतनश्रेणीच्या आदेशात बी.एड्. शिक्षणक्रम पाच ते सात वर्षात पूर्ण करावा, असे नमूद करण्यात आले.

पदवीधर वेतन श्रेणीच्या आदेशात पाच ते सात वर्षात बी.एड्. शिक्षणक्रम पूर्ण करण्याची अट असल्यामुळे विद्याशाखेच्या बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेत पदवीधर वेतनश्रेणी मिळालेल्या उमेदवारास पदवीधर वेतन श्रेणी मिळालेल्या दिनांकापासून बी.एड्. प्रवेशापर्यंत प्रतिवर्षी एक गुण अतिरिक्त देण्यात येतात.

अलिकडे RTE २००९ च्या नियमानुसार २०१४ नंतर डी.एड. असणाऱ्या शिक्षकांना पदवीधर वेतन श्रेणी देण्यात आलेली आहे. मात्र त्यांच्या नियुक्ती आदेशात बी.एड्. करणे अनिवार्य आहे असा उलेख केलेला नाही. त्यांच्या पदवीधर वेतनश्रेणीच्या आदेशात इयत्ता ६ वी ते ८ वीच्या वर्गावरील पदवीधर शिक्षकांना देय असलेल्या वेतनश्रेणी संदर्भ शासन परिपत्रक क्र. वेतन / १२१६ प्र. क्र. १६ टी.एन.टी. – ३, दिनांक १३ ऑक्टोबर २०१६, विज्ञान विषय प्रवर्ग (गणित/ विज्ञान/

| | |
|---|---|
| | अभियांत्रिकी) भाषा विषय प्रवर्ग (मराठी/ इंग्रजी/ हिंदी/ उर्दू) सामाजिक शास्त्र (इतिहास/ भूगोल) मुद्दा क्र. ५ मध्ये पदवीधर आणि डी.एड्./बी.एड्.असा उल्लेख आहे. अशा सर्व उमेदवारांना शैक्षणिक वर्षे २०२४-२६ च्या तुकडीसाठी सुध्दा पदवीधर वेतनश्रेणीचे गुण देण्यात आलेले आहे.<br>मात्र अशा पदवीधर वेतनश्रेणी प्राप्त उमेदवारांना पदवीधर श्रेणीचे बी.एड्. प्रवेशासाठी अतिरिक्त गुण देताना, अनेक तक्रारी विद्यापीठाकडे येतात. मुक्त विद्यापीठात प्राथमिक स्तरावर कार्यरत असलेल्या सेवांतर्गत शिक्षकांना प्रवेश दिला जातो. ते डी.एड. असतात, त्यामुळे शासन परिपत्रकानुसार पदवी आणि डी.एड. उमेदवारही पदवीधर वेतनश्रेणीसाठी पात्र आहे.<br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ प्रमाणे पदवीधर वेतनश्रेणी प्राप्त असणा-या व त्यांच्या पदवीधर वेतनश्रेणीच्या आदेशात बी.एड्. शिक्षणक्रम पाच ते सात वर्षात पूर्ण करण्याची अट असलेल्या आणि नसलेल्या उमेदवारांना (शिक्षकांना) पदवीधर वेतन श्रेणीचे प्रतिवर्षी १ याप्रमाणे मिळणारे अतिरिक्त गुण देऊ नये. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>(सहपत्र ३)<br>**निर्णय :**<br>सेवांतर्गत बी.एड. प्रवेशासाठी पदवीधर वेतन श्रेणीचे प्रतिवर्षी १ याप्रमाणे मिळणारे अतिरिक्त गुण देऊ नये यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 63.05 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 05**<br>**विषय : सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रमाच्या सीमालगत जागा देणेबाबत..**<br>**टिप्पणी** : बी.एड्. शिक्षणक्रमासाठी गोवा, बेळगाव व बिदर या महाराष्ट्राच्या सीमारेषेनजीकच्या मराठी भाषिक शिक्षकांसाठी प्रत्येक ५०० विद्यार्थ्यांमागे एक जागा देण्यात येते. त्यानुसार सिंधुदुर्ग, लातूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यासाठी प्रत्येकी १ जागा देण्यात येते.<br>अलिकडच्या काळात सिंधूदुर्ग जिल्ह्यातून बी.एड्. प्रवेशासाठी अर्ज कमी येतात त्यामानाने गोवा मधून जास्त अर्ज असतात. गोवा मधून जास्त प्रवेश अर्ज असले तरी त्यातून फक्त १ जागा सिंधुदुर्ग जिल्ह्यात भरण्यात येते. या जिल्ह्यातील लोकसंख्या कमी असल्यामुळे बी.एड्. ला प्रवेश घेणाऱ्या प्रवेशार्थीची संख्या कमी असते. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हाच्या अभ्यासकेंद्रावर प्रवेश कमी होतात व त्याचा परिणाम अभ्यासकेंद्राच्या कार्यावर व आर्थिक नियोजनावर होतो.<br>सन २०२४ पर्यंत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रिक्त असलेल्या जागा भरताना कोल्हापूर विभागातील जिल्ह्यातील प्रवेश अर्जांचा आरक्षणानुसार व गुणानुक्रमाने विचार करून त्या विभागातील इतर जिल्ह्याच्या अभ्यासकेंद्रावर भरल्या जातात.<br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>१) सिंधूदुर्ग जिल्ह्यातील उर्वरित जागा गोव्यातून आलेल्या अर्जातून भरण्यास मान्यता द्यावी<br>**किंवा**<br>२) कोल्हापूर विभागातील इतर जिल्ह्यातील केंद्रावरील आरक्षणाच्या नियमानुसार भरण्याबाबत विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :**<br>सीमालागत कोल्हापूर (बेळगाव), लातूर (बिदर), सिंधुदुर्ग (गोवा) जिल्ह्यांसाठी प्रवेश अर्ज कमी असल्यास लगतच्या जिल्ह्यातील गुणवत्तेनुसार अर्जांचा आवश्यकतेनुसार प्रवेशासाठी पात्र धरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| 63.06 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 06**<br>**विषय : सेवांतर्गत बी.एड् शिक्षणक्रमास दिव्यांग व्यक्तींना समांतर आरक्षणाच्या नियमाप्रमाणे प्रवेश देणे बाबत......**<br>**टिप्पणी** : दिव्याग अधिनियम २०१६ नुसार, दिव्यांगाच्या पाच प्रकारानुसार बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी दिव्यांग व्यक्तींना ५% आरक्षण देण्यात येते. दिव्यांगाच्या पाच प्रकारांपैकी ज्या दिव्यांगत्वाच्या प्रकारचे प्रवेश अर्ज कमी असतील, त्या दिव्यांग प्रकाराचा प्रथम विचार केला जातो. म्हणजेच प्रथम कमी अर्जासंख्या असलेल्या व त्यानतंर जास्त दिव्यांग अर्ज असलेल्या दिव्यांगत्व प्रकारांना आरक्षण देण्यात येते. बी.एड्. शिक्षणक्रमाच्या १५०० प्रवेशाच्या जागा आहेत. त्यामुळे दिव्यांग प्रवर्गासाठी समांतर आरक्षणाच्या ७५ जागा आहेत.<br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>जिल्हानिहाय दिव्यांग समांतर देताना ३६ जिल्ह्यासाठी २/३ जागा गुणवत्तेनुसार देण्यात येतात. मात्र सदरील आरक्षण देताना काही जिल्ह्यांतून दिव्यांगाचे अर्ज कमी असतात, तर काही जिल्ह्यातून ते नसतात. त्यामुळे ज्या जिल्ह्यात दिव्यांगत्वाचे अर्ज कमी असतील किंवा नसतील, ती जागा इतर जिल्ह्यांना गुणवत्तेनुसार देण्यातबाबत विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय :**<br>जिल्हानिहाय दिव्यांगत्वाचे किमान दोन आणि गरजेनुसार उर्वरित केंद्रांवर तीन जागा देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली |
| 63.07 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 07**<br>**विषय : आजी माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांच्या सेवांतर्गत बी.एड्. प्रवेशाबाबत..**<br>**टिप्पणी** : शासन निर्णय क्र एस.बी.सी.२५९५/बी.एड्.प्रवेश/३७९/९५ मशी-३ दिनांक १५ जानेवारी १९९६ प्रमाणे आजी व माजी सैनिक पती व पत्नी, मुले व अविवाहित मुलगी ह्यांना २% समांतर आरक्षण देण्यात आलेले आहे. बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत आजी-माजी सैनिकांसाठी ३० जागा येतात.<br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>आजी माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांच्या जागांचे प्रवेश करताना प्रथमत: प्रत्येक जिल्ह्यात १ जागा गुणवत्तेनुसार देण्यात येतील, मात्र ज्या जिल्ह्यात आजी / माजी सैनिक प्रवेश अर्ज नसतील, त्या जागा अर्ज असलेल्या जिल्ह्यातून समातंर आरक्षणाच्या नियमाप्रमाणे एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास गुणवत्तेनुसार २% जागा भरण्यात याव्यात असे वाटते. करिता विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय :**<br>प्रत्येक जिल्ह्याला आजी माजी सैनिकाचे किमान एक जागा देण्यात येईल. तीस जागा पूर्ण न झाल्यास ज्या केंद्रात एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज असतील त्यांचा गुणवत्तेनुसार प्रवेशासाठी विचार करण्यात येईल असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. |
| 63.08 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 08**<br>**विषय : सेवांतर्गत बी.एड् शिक्षणक्रमाच्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी आणि पदवी नंतरच्या पदविकेचे गुण न घेणेबाबत.**<br>**टिप्पणी :** सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमात पदवी आणि पदव्युत्तर पदवी आणि पदवी नंतरच्या पदविकेचे श्रेणीनिहाय गुण सन २०२४ पर्यंतच्या प्रवेश प्रक्रीयेमध्ये देण्यात येत होते. विद्यापीठनिहाय श्रेणीदानात भिन्नता आहे. प्रवेश पडताळणीच्या वेळी त्यात अडचणी येतात. |

सेवांतर्गत बी.एड्. हे प्रामुख्याने प्रवेशार्थीच्या अनुभवाच्या आधारे दिले जातात.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रमासाठी पदवी आणि पदव्युत्तर पदवी आणि पदवी नंतरच्या पदविकेचे गुण न घेणेबाबत विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर

**निर्णय :**

सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रमासाठी पदवीसाठी - ३ गुण, पदव्युत्तर पदवी - ५ गुण आणि पदवी नंतरच्या पदविकेसाठी - ४ गुण घ्यावे यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

63.09 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 09**

**विषय : सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रम प्रवेशासाठी सक्षम अधिकाऱ्याच्या अनुभव प्रमाणपत्रा बाबत..**

**टिप्पणी** ; सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेशार्थीने प्रवेश घेताना संबंधित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र विद्यापीठाने निश्चित केलेल्या नमुन्यानुसार सादर करणे अनिवार्य आहे. ह्या प्रमाणपत्रात सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यात उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र आणि सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र एकत्रित घेतल्यास त्यात अनुभवात अचूकता येईल.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.**

सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशार्थीने डी.एड. नंतरच्या सेवेबाबतचे प्रतिज्ञापत्र आणि सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सुधारित प्रपत्र मान्यतेसाठी सादर. **(सहपत्र ४)**

**निर्णय :**

सेवांतर्गत बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशार्थीने डी.एड. नंतरच्या सेवेबाबतचे प्रतिज्ञापत्र आणि सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सुधारित प्रपत्रास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

63.10 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 10**

**विषय: सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी UDID क्रमांकाचेच दिव्यांगाशी संबंधित प्रमाणपत्र ग्राह्य धरणेबाबत..**

**टिप्पणी** : दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार दिव्यागांचे पाच प्रकार व त्यात एकवीस उपप्रकार करण्यात आलेले आहे. सेवांतर्गत बी.एड्. आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रम प्रवेश प्रक्रियेत ५ % समांतर आरक्षण दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार आहे. सेवांतर्गत बी.एड्. आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमासाठी दिव्यागांचे पाच प्रकार आणि त्यातील उपप्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

| क्र. | दिव्यांग प्रकार | दिव्यांग उपप्रकार |
|---|---|---|
| १ | १ % शारीरिक दिव्यांगत्व | • Blindness or Low Vision (अल्पदृष्टी)<br>• Speech and Language Disability (बोलणे आणि भाषा कमतरता)<br>• Leprosy cured person (कुष्टरोग बरा झालेला व्यक्ती)<br>• Cerebral Palsy (सेरेब्रल पाल्सी)<br>• Hard of Hearing (ऐकण्यात कमजोरी)<br>• Muscular Dystrophy (स्नायू डिस्ट्रॉफी)<br>• Locomotor or disability (लोको मोटर अपंगत्व)<br>• Acid Attack Victims (ॲसिड आघातबळी) |

| | | |
|---|---|---|
| | | • Dwarfism (बुटकेपणा)<br>• Deaf (बहिरा)<br>• Physical Disabilities (शारीरिक दिव्यांगत्व) |
| २ | १ % बौद्धिक अक्षमता | • Autism Spectrum Disorder (ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर)<br>• Specific Learning Disabilities (विशिष्ट गोष्टी शिकण्यातील अपंगत्व)<br>• Intellectual Disability (बौद्धिक अपंगत्व) |
| ३ | १% मानसिक वर्तणूक | • Mental illness (मानसिक आजार)<br>• Mental Behavior (मानसिक वागणूक) |
| ४ | १ % बहु दिव्यांगत्व | • Thalassemia (थैलेसीमिया)<br>• Haemophillia (हीमोफिलिया)<br>• Parkinsons Disease (पार्किन्सन रोग)<br>• Sickle Cell Disease (सिकलसेल रोग)<br>• Multiple Sclerosis (मल्टीपल स्केलेरोसिस)<br>• Disabilities Caused (अपंगत्व येण्याचे कारण) |
| ५ | १ % दिव्यांगत्व येण्याचे कारण | • Multiple Disabilities (बहु अपंगत्व) |

महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग, शासन परिपत्रक सांकेतांक २०२४०६२७१३१९५३४०३५ नुसार दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वासंदर्भातील सर्व लाभ मिळविण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card- UDID) बंधनकारक करण्यात आले आहे. **(सहपत्र ५)**

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

सेवांतर्गत बी.एड्. आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card- UDID) अनिवार्य करण्यात यावे, असे वाटते. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर..

**निर्णय :**

सेवांतर्गत बी.एड्. आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card- UDID) अनिवार्य करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

63.11 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 11**

**विषय : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या अनाथ व्यक्तींच्या प्रवेशाच्या आरक्षणाबाबत..**

**टिप्पणी** : महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग यांच्याकडून प्रसिद्ध करण्यात आलेला अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३ दिनांक ६ एप्रिल २०२३, शासन निर्णय सांकेतांक २०२३०४०६१३४५५५५०३० नुसार अनाथांना उपलब्ध जागांच्या १ % इतके आरक्षण लागू करण्यात आले आहे. सदरील आरक्षणाची अंमलबजावणी ही दिव्यांग आरक्षणाच्या धर्तीवर करण्यात येईल,असे नमूद केले आहे.

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी अनाथ व्यक्तींना १ % समांतर आरक्षणातून आरक्षण देण्याबाबत विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.. (सहपत्र ६)

**निर्णय :**

सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी अनाथ व्यक्तींना १ % समांतर आरक्षणातून आरक्षण देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

63.12 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 12**

**विषय : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेशासाठी महिला आरक्षणाबाबत..**

**टिप्पणी :** महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.जीईसी.-१००० (१२३/२०००ताशि-१) दि.१७ एप्रिल २००० च्या नुसार राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशांकरिता महिलांसाठी ३०% टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे. सदरचे आरक्षण खुल्या व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील, जर खुल्या जागा १०० असतील तर त्यापैकी ३०% जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात येतील.

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

महिला सुरूवातीला आल्या तरी त्यांना महिला म्हणूनच प्रवेश देण्यात येईल. वरील आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे, ज्या प्रवर्गातून उमेदवाराने प्रवेश अर्ज भरलेला असेल, त्यांना त्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात येईल व त्या प्रवर्गातील ती जागा कमी करण्यात येईल. वरील प्रकारच्या उमेदवारांनी सामाजिक आरक्षणातून प्रवेश अर्ज भरलेला असल्यास, संबधित प्रवर्गाचे आवश्यक ते प्रमाणपत्र त्याच्याकडे असणे अनिवार्य आहे. त्या प्रवर्गातील महिला उपलब्ध नसल्यास ती जागा प्रथम त्या-त्या वर्गातील पुरुषांना देण्यात येईल. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.. **(सहपत्र ७)**

**निर्णय :**

महिला सुरूवातीला आल्या तरी त्यांना महिला म्हणूनच प्रवेश देण्यात येईल. उमेदवारांनी सामाजिक आरक्षणातून प्रवेश अर्ज भरलेला असल्यास, संबधित प्रवर्गाचे आवश्यक ते प्रमाणपत्र त्याच्याकडे असणे अनिवार्य आहे. त्या प्रवर्गातील महिला उपलब्ध नसल्यास ती जागा प्रथम त्या-त्या वर्गातील पुरुषांना देण्यात येईल यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

63.13 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 13**

**विषय : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेशासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आरक्षणाबाबत (EWS) व प्रवेश रद्द बाबत..**

**टिप्पणी :** दिनांक ३१ मे २०२१ च्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:४०१९/प्र.क्र.३१/१६-अ' प्रमाणे व शासन निर्णय दि.१२ फेब्रुवारी २०१९ मधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आरक्षणाच्या सबंधित मुद्दा. क्र. (क) निकषांची पूर्तता करणारा उमेदवार हा EWS प्रवर्गातून प्रवेशास पात्र समजला जातो.

बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करणारे उमेदवार हे प्राथमिक शिक्षक असतात. काही शिक्षकांचे वार्षिक उत्पन्न हे आठ लाखापेक्षा अधिक असते. तरी देखील EWS प्रवर्गाचे

| | |
|---|---|
| | प्रमाणपत्र शासनाने प्राधिकृत अधिका-याकडून EWS चे प्रमाणपत्र प्राप्त करून, बी.एड्. शिक्षणक्रमासाठी प्रवेश मिळवितात.<br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेशासाठी खोटे प्रमाणपत्र देऊन EWS या प्रवर्गातून प्रवेश घेतल्यास उमेदवाराचा प्रवेश रद्द करावा आणि त्याने भरलेले बी.एड्. शिक्षणक्रमाचे शुल्क परतावा करू नये, असे वाटते. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर. **(सहपत्र ८)**<br>**निर्णय :**<br>सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेशासाठी खोटें प्रमाणपत्र असल्याचे सिद्ध झाल्यास EWS या प्रवर्गातून प्रवेश घेतल्यास उमेदवाराचा प्रवेश रद्द करावा आणि त्याने भरलेले बी.एड्. शिक्षणक्रमाचे शुल्क परतावा करू नये असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. |
| 63.14 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 14**<br>**विषय: सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील तसेच सर्व सामाजिक आरक्षण (मागास) प्रवर्गातील महिलांना खुल्या प्रवर्गातून आरक्षित असलेल्या महिलांच्या जागेसाठी नॉन-क्रिमिलिअर प्रमाणपत्र अट रद्द करणेबाबत...**<br>**टिप्पणी :** महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक- महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/कार्या-२ दि.०४ मे २०२३ च्या शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातील तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना खुल्या प्रवर्गातून आरक्षित असलेल्या महिलांच्या जागेसाठी नॉन-क्रिमिलिअर प्रमाणपत्र अट रद्द करण्यात आलेली आहे.<br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी खुल्या प्रवर्गातील तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना खुल्या प्रवर्गातून आरक्षित असलेल्या महिलांच्या जागेसाठी नॉन-क्रिमिलिअर प्रमाणपत्र अट रद्द करण्याबाबत सदरील शासन निर्णय लागू करण्यात यावा, असे वाटते. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.. **(सहपत्र ९)**<br>**निर्णय :**<br>सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी खुल्या प्रवर्गातील तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना खुल्या प्रवर्गातून आरक्षित असलेल्या महिलांच्या जागेसाठी नॉन-क्रिमिलिअर प्रमाणपत्र अट रद्द करण्याबाबत सदरील शासन निर्णय लागू करण्यात यावा असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. |
| 63.15 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 15**<br>**विषय: विशेष मागास प्रवर्गांच्या (SBC) सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमातील आरक्षणाबाबत....**<br>**टिप्पणी:** महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टीईएम. ३३९७\ १२९२६/ (९०८६) ताशि-१ दि.११ जुलै १९९७ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक सस्थांतील सर्व विद्या शाखांच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशासाठी लागू राहतील.<br>१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती, त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यास यावी.<br>२. भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. टीईएम १०९४/ (६३०३)/तांशि-९, दि.३ जून १९९४ |

मधील परिच्छेद क्र.४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५०% जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्यक्ष संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त (मेरीट ग्रेट्), संच मूल्यभारित (पेमेंट सीटस्) जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असावे.

३. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २% पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

४. रिक्त जागावर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २% जागांवर प्रदेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात याव्यात.

सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमासाठी SBC प्रवर्गातून अर्ज करणारे उमेदवार हे OBC चे प्रमाणपत्र नसतांना OBC प्रवर्गातून सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेश देण्याची विविध पत्राद्वारे व संघटनाद्वारे मागणी करतात.

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

ज्या विशेष मागास प्रवर्गातील उमेदवाराकडे महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टीईएम. ३३९७\ १२९२६/ (९०८६) ताशि-१ दि.११ जुलै १९९७ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १ नुसार OBC प्रवर्गाचे प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलियर प्रमाणपत्र असेल त्यांनाच OBC प्रवर्गातून मधून प्रवेश देण्यात यावा. OBC प्रवर्गाचे प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलियर प्रमाणपत्र नसल्यास त्यांना SBC प्रवर्गाच्या उपरोक्त नियम क्र.३ व ४ नुसार प्रवेश देण्यात यावा, असे वाटेत. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर..

**(सहपत्र १०)**

**निर्णय :**

ज्या विशेष मागास प्रवर्गातील उमेदवाराकडे महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टीईएम. ३३९७\ १२९२६/ (९०८६) ताशि-१ दि.११ जुलै १९९७ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १ नुसार OBC प्रवर्गाचे प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलियर प्रमाणपत्र असेल त्यांनाच OBC प्रवर्गातून मधून प्रवेश देण्यात यावा. OBC प्रवर्गाचे प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलियर प्रमाणपत्र नसल्यास त्यांना SBC प्रवर्गाच्या उपरोक्त नियम क्र.३ व ४ नुसार प्रवेश देण्यात यावा असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

63.16 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 16**

**विषय : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी ना-सायस्तर दाखला (NCL) सादर करणेबाबत...**

**टिप्पणी**: OBC/VJ-A/NT-B/NT-C/NT-D/SBC प्रवर्गातील उमेदवारांकडे सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेश संबंधित प्रवर्गातून प्रवेश अर्ज भरत असल्यास संबंधित वर्षाचा ना–सायस्तर दाखला असणे अनिवार्य आहे. मात्र काही उमेदवार हे NCLची खोटी माहिती भरून सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेशासाठी अर्ज करताता. मात्र सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. कागदपत्र तपासणीच्या वेळी त्यांच्या ते NCL सादर करू शकत नसल्याने NCL काढण्यासाठी दिलेली पोचपावती ग्राह्य धरण्याचा आग्रह धरतात.

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

शैक्षणिक वर्षे २०२५-२७ च्या प्रवेशाच्या वेळी सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्.

| | |
|---|---|
| | प्रवेश अर्ज भरताना संबंधित उमेदाराकडे NCL प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल. NCL प्रमाणपत्रावरील दिनांक व इतर माहिती ऑनलाईन अर्जात भरणे अनिवार्य आहे. सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. कागदपत्र तपासताना तीच माहिती ग्राह्य धरावी, NCL काढण्यासाठी दिलेली पोचपावती ग्राह्य धरली जाणार नाही. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय :**<br>शैक्षणिक वर्षे २०२५-२७ च्या प्रवेशाच्या वेळी सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. प्रवेश अर्ज भरताना संबंधित उमेदाराकडे NCL प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल. NCL प्रमाणपत्रावरील दिनांक व इतर माहिती ऑनलाईन अर्जात भरणे अनिवार्य आहे. सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. कागदपत्र तपासताना तीच माहिती ग्राह्य धरावी असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. |
| 63.17 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 17**<br>**विषय : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या सामाजिक व शैक्षणिक मागास (SEBC) प्रवर्गाच्या आरक्षणाबाबत..**<br>**टिप्पणी :** महाराष्ट्र राज्य अधिनियम क्र.१६ दि.२६ फेब्रुवारी २०२४ नुसार, महाराष्ट्र शासन, समान्य प्रशासन विभाग,शा.नि.क्र.बी.सी.सी. २०२४/ प्र.क्र.७५ / १६ क नुसार व महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनाच (उच्च शिक्षण) याच्या दि.१८ जून २०२४ च्या परिपत्रक जा.क्र. उशिसं/मवि-१/ परिपत्रक/ २०२४/ ३२७० नुसार सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) वर्गाकरिता १०% आरक्षण प्रवेशासाठी लागू करण्यात आलेले आहे. या वर्गात मराठा समाजाचा करण्यात आलेला आहे. सदरील आरक्षण हे सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी लागू करण्यात यावे.<br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, तसेच उन्नत व प्रगटाचे तत्व लागू असेल आणि ज्या व्यक्ती उन्नत व प्रगत गटात मोडत नसतील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील व्यक्तींनाच केवळ या अधिनियमाखाली आरक्षण देण्याबाबत चर्चा मान्यतेसाठी सादर.. **(सहपत्र ११)**<br>**निर्णय :**<br>सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, तसेच उन्नत व प्रगटाचे तत्व लागू असेल आणि ज्या व्यक्ती उन्नत व प्रगत गटात मोडत नसतील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील व्यक्तींनाच केवळ या अधिनियमाखाली आरक्षण देण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 63.18 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 18**<br>**विषय: विषय: सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या गुणाबाबत....**<br>**टिप्पणी** : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशार्थीकडे खालील तीन प्रकारापैकी एका प्रकारचे पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक असते. त्यानुसार त्याची टक्केवारी काढताना पुढील नियम वापरावे.<br><br>**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**<br>१) पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या गुणपत्रकात टक्केवारी, CGPA असल्यास पुढीलप्रमाणे गुणांची नोंद करावी. |

| गुणनोंदणी प्रकार | प्रवेश अर्जात नोंदणी |
|---|---|
| फक्त टक्केवारी | गुण पत्रकातील टक्केवारी लिहिणे. |
| CGPA+ टक्केवारी | गुण पत्रकातील टक्केवारी लिहिणे. |
| CGPA | CGPA X10-7.5 सूत्राचा वापर करून टक्केवारी काढणे. |

२) प्रवेशार्थी अगोदर टी. वाय (T.Y) उतीर्ण, त्यानंतर एफ. वाय (F.Y) आणि एस. वाय (S.Y) उतीर्ण झालेला असल्यास त्यांनी संबधित विद्यापीठाकडून एकत्रित गुणपत्रक घ्यावे.

**विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.**

**निर्णय :**

१. CGPA वरून टक्केवारी काढण्याचे CGPA X10-7.5 हे सूत्र मुक्त विद्यापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी असल्यास वापरण्यात यावे.

२. इतर विद्यापीठांमध्ये CGPA देऊन गुणपत्रकाच्या मागील बाजूस CGPA वरून टक्केवारी काढण्याचे सूत्र असल्यास उमेदवाराने त्या पद्धतीने टक्केवारी काढावी.

३. इतर विद्यापीठांमध्ये CGPA देऊन गुणपत्रकाच्या मागील बाजूस CGPA वरून टक्केवारी काढण्याचे सूत्र नसल्यास उमेदवाराने संबंधित विद्यापीठाकडून टक्केवारी काढून त्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

63.19 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 19**

**विषय : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी अतिरिक्त गुणाबाबत...**

**टिप्पणी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विविध शिक्षणक्रम पूर्ण करणा-या प्रवेशार्थींना स्तरानुसार २,३,४,५,६ गुण अतिरिक्त दिले जातात. मुक्त विद्यापीठातील एका स्तरातील एका पेक्षा जास्त शिक्षणक्रम प्रवेशार्थीने उतीर्ण केलेले असल्यास त्या-त्या स्तरातील एकाच शिक्षणक्रमाचे अतिरिक्त गुण देण्यात येतील.

प्रमाणपत्र - २ गुण, पदविका - ३ गुण, पदवी - ४ गुण,

पदव्युत्तर पदवी – ५ गुण, संशोधन पदवी (एम.फील / पीएचडी) - ६ गुण

प्रवेशार्थीने पदवी नंतरची पदविका घेतलेली असल्यास उदाहरणार्थ (डी. एस. एम./ बी. पीएड) विशेष बी.एड्. साठी RCI मान्यताप्राप्त पदव्युत्तर पदविका असल्यास त्यास अतिरिक्त २ गुण देण्यात येतील.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

१) प्रवेशार्थीकडे मुक्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन पदवी असल्यास त्याला अतिरिक्त गुण देण्यास मान्यता द्यावी

२) प्रवेशार्थीकडे एका स्तरातील एका पेक्षा जास्त पदवी किवा पदव्युत्तर पदवी असल्यास एका पदवीचे गुण विचारात घेण्याबाबत विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर

**निर्णय :**

१) प्रवेशार्थीकडे मुक्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन पदवी असल्यास त्याला अतिरिक्त गुण देण्यास मान्यता देण्यात आली.

२) प्रवेशार्थीकडे एका स्तरातील एका पेक्षा जास्त पदवी किवा पदव्युत्तर पदवी असल्यास एका

| | |
|---|---|
| | पदवीचे गुण विचारात घेण्याबाबत मान्यता देण्यात आली.<br>३) संशोधन पदवीचे (एम.फील / पीएचडी) - ६ गुण देण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरविण्यात आले.<br>४) उमेदवाराने पदवी नंतरची पदव्युत्तर पदविका घेतलेली असल्यास त्याला अतिरिक्त ५ गुण देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 63.20 | विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 20<br>**विषय : सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाचे स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य ऑनलाईन जमा करणे बाबत...**<br>**टिप्पणी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रम राबविण्यात येतो. सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार विद्यार्थ्यांचे स्वाध्याय आणि प्रात्यक्षिक कार्य ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाकडे सादर करून त्यांचे मूल्यमापन करावयाचे आहे.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**<br>सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाचे स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य ऑनलाईन सादर करण्यासाठी विषय शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर....<br>**निर्णय :**<br>सेवांतर्गत बी.एड् आणि विशेष बी.एड्. शिक्षणक्रमाचे स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य ऑनलाईन सादर करण्यासाठी सन २०२५-२६ या तुकडीसाठी लागू करण्यात येऊ नये असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. |
| 63.22 | विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 22<br>**विषय : बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाची पुर्ननोंदणी करण्यासाठीची नियमावली...**<br>**टिपणी :** बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०१५ पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे. या शिक्षणक्रमाचा नोंदणी कालावधी पाच वर्षाचा आहे. ज्या विद्यार्थ्याने नोंदणी कालावधीत शिक्षणक्रम पूर्ण केलेला नसेल अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी संधी दिली जाते.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**<br>पुर्ननोंदणी करण्यासाठी खालील नियम लागू करण्यात येतील.<br>१. बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या पुर्ननोंदणी करण्यासाठी किमान प्रथम वर्षातील दोन्ही सत्र पूर्ण झालेले असतील अश्याच विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार ज्या महिन्यात नोंदणी कालावधी संपुष्टात येईल, त्यानंतर पुढील एक वर्षापर्यंत त्या विद्यार्थ्यांनी पुर्ननोंदणी करणे अनिवार्य असेल.<br>२. ज्या विद्यार्थ्यांचे तात्विक अभ्यासक्रम आणि प्रात्यक्षिक कार्य अपूर्ण राहिले असेल तर त्या विद्यार्थ्यांनी त्या त्या वर्षाचे विद्यापीठ, परीक्षा आणि अभ्यासकेंद्र शुल्कासह विद्यापीठ नियमानुसार पुर्ननोंदणी शुल्कही भरणे अनिवार्य असेल.<br>३. ज्या विद्यार्थ्यांचे फक्त प्रात्यक्षिक कार्य अपूर्ण असेल आणि अंतिम परीक्षा उत्तीर्ण असेल त्या विद्यार्थ्यांनी प्रतीवर्षाचे विद्यापीठ शुल्क रु. २०००/- आणि त्या त्या वर्षाचे अभ्यासकेंद्र शुल्क भरणे अनिवार्य असेल.<br>४. ज्या विद्यार्थ्यांचे फक्त तात्विक अभ्यासक्रम अनुत्तीर्ण किंवा परीक्षा दिलेली नसेल त्या विद्यार्थ्यांनी त्या वर्षाचे विद्यापीठ शुल्क नियमानुसार पुर्ननोंदणी शुल्कही भरणे अनिवार्य असेल. |

५. पुर्ननोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे मुख्यालयातील किंवा विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार कार्यान्वित असलेल्या बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रावर कार्य पूर्ण करता येईल.

**निर्णय :**

**बी.एड. विशेष शिक्षणक्रमाच्या** पुर्ननोंदणीचे नियम तयार करण्यापूर्वी २०१५ पासून किती विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहे. त्याचप्रमाणे RCI च्या नियमानुसार जी अभ्यासकेंद्र बंद झालेली आहे त्या ठिकाणच्या किती विद्यार्थ्यांचे कार्य अपूर्ण आहे याचा सविस्तर तपशील संबंधित संयोजकांनी तयार करावा आणि तो पुढील शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेमध्ये ठेवण्यात यावा असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

63.23 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 23**

**विषय: शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. शिक्षणशास्त्र, बी.एड्., विशेष बी.एड्. शिक्षण, शालेय व्यवस्थापन पदविका, बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र, स्वयं साहाय्यता प्रमाणपत्र मूलभूत व घरकाम कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणक्रम प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, परीक्षक, गृहपाठ निर्मिती व मूल्यमापनासंदर्भात तज्ज्ञांच्या नावास मान्यते बाबत...**

**टिप्पणी** :शिक्षणशाख विद्याशाखेमार्फत कार्यान्वित असलेल्या शिक्षणक्रमाच्या संदर्भात प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी तज्ज्ञांच्या नावे मागविली आहे. विद्याशाखेने अभ्यासकेंद्रावर कार्य करणा-या तज्ज्ञ व्यक्तींची नावे प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, परीक्षक, गृहपाठ निर्मितीसाठी पत्राद्वारे मागविली आहे. सदरील प्राप्त झालेली नावे विद्याशाखा परिषदे समोर चर्चा व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर (सोबत)

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमामध्येस्वयंअध्यापन साहित्य लेखक म्हणून कार्य केलेले त्याचप्रमाणे अभ्यासकेंद्रावरील समंत्रक हे प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी तज्ज्ञांच्या नावास मान्यतेसाठी विद्याशाखा परिषदे समोर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर..

**निर्णय :**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमामध्येस्वयंअध्यापन साहित्य लेखक म्हणून कार्य केलेले त्याचप्रमाणे अभ्यासकेंद्रावरील समंत्रक हे प्रश्नपेढी, प्रश्नपत्रिका, गृहपाठ निर्मितीसाठी तज्ज्ञांच्या नावास मान्यता देण्याचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्याकडे देण्यात यावे असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

63.24 **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 24**

**विषय : प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका २०२५-२६ मान्यतेबाबत.**

**टिप्पणी** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेतंर्गत कार्यान्वित प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची सन जानेवारी २०२५ च्या तुकडीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु केलेली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत बालसंगोपन आणि रंजन शिक्षण, स्वयं साहाय्यता प्रमाणपत्र मूलभूत व घरकाम कौशल्य हे प्रमाणपत्र शिक्षणक्रम प्रवेशासाठी उपलब्ध होणार आहे. त्याची माहितीपुस्तिका, नियमावली सोबत चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर..**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्रमाणपत्र शिक्षणक्रम जानेवारी २०२५ ची माहितीपुस्तिका शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेसमोर **चर्चा व मान्यतेस्तव सादर.** **(सहपत्र १२)**

| | |
|---|---|
| | **निर्णय :**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत बालसंगोपन आणि रंजन शिक्षण, स्वयं साहाय्यता प्रमाणपत्र मूलभूत व घरकाम कौशल्य ह्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या जानेवारी २०२५ च्या माहितीपुस्तीकेस मान्यता देण्यात आली. |

शेवटी विजयकुमार पाईकराव यांनी सर्वांचे आभार मानले आणि सहविचार बैठक संपल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने सांगण्यात आले.

प्रोफेसर संजीवनी महाले
अध्यक्ष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

मा. कुलगुरू, कृपया मान्यतेसाठी सविनय सादर.

मान्य

**मान्य / अमान्य**

**मा. कुलगुरु**